MHGA050003512020

<u>न्यायालय विद्यमान दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), देसाईगंज</u>
<u>जिल्हा – गडचिरोली</u>

( पिठासीन अधिकारी आ.ऋ. भडके )

<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ०८/२०२०</u>
**(CNR No. MHGA050003512020)**

<u>वादी</u> :– १) **सौ. उत्तराबाई ज. मुकूंदा लुटे,**
वय अंदाजे ५२ वर्षे, धंदा – मजुरी,
राहणार– नैनपूरवार्ड, देसाईगंज,
तालुका–देसाईगंज, जिल्हा–गडचिरोली.

२) **सौ. सुलभा ज. निलकंठ पिलारे,**
वय अंदाजे ३० वर्षे, धंदा – घरकाम,
राहणार– आमगांव, तालुका–देसाईगंज,
जिल्हा–गडचिरोली.

३) **सौ. मिरा उर्फ लोभा ज. महेश देशमुख,**
वय अंदाजे २६ वर्षे, धंदा – घरकाम,
राहणार– भगतसिंग वार्ड, देसाईगंज,
तालुका–देसाईगंज, जिल्हा–गडचिरोली.

**– <u>विरुध्द</u> –**

<u>प्रतिवादी</u> :– १) **मुकूंदा व. संपत लुटे,**
वय अंदाजे ६५ वर्षे, धंदा – कास्तकारी,

२) **भास्कर व. मुकूंदा लुटे,**
वय अंदाजे ३० वर्षे, धंदा – कास्तकारी,

३) **सौ. इंदिरा ज. मुकूंदा लुटे,**
वय अंदाजे ५५ वर्षे, धंदा – घरकाम,
सर्व प्रतीवादी राहणार– नैनपुर वार्ड,
तालुका–देसाईगंज, जिल्हा–गडचिरोली.

---

वादींतर्फे विद्वान विधिज्ञ अडॅ. एन.डी. वारजुकर.
प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञ ॲड. डि.डब्ल्यु. पिलारे.

---

## आदेश निशाणी क.०५ वर

(दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२० रोजी पारित)

०१) वादींनी सदरचा दावा कायमचे मनाईहुकुमाकरिता दाखल केला असून प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादींनी वाद जमीनीवरील वादींच्या ताब्यात व वहिवाटीस असा तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश होण्यासाठी विनंती केली आहे.

०२) **वादीचे थोडक्यात कथन असे की**,

मौजा–नैनपुर, तालुका–देसाईगंज, जिल्हा–गडचिरोली येथील भुमापन क्रमांक ७१, आराजी ०.६८ हे.आर पैकी ०.४० हे.आर. पश्चिम दिशेकडील शेती (यानंतर यास वादजमीन संबोधण्यात येईल) हि वादींना पोटगीदाखल पालनपोषनासाठी दिनांक १३/०२/१९९६ पासून दिली होती. तेव्हापासून त्यावर वादींचा ताबा व वहिवाट होती. त्यानंतर जानेवारी २०१३ मध्ये प्रतीवादी क्रमांक ०१ ने वाद जमीन बळजबरीने स्वत:च्या ताब्यात घेतली. त्यामुळे वादी क्रमांक ०१ ने किरकोळ फौजदारी मामला क्रमांक २२/२०१३ दाखल केला व त्यामध्ये मध्यस्थीमार्फत दिनांक ०६/०७/२०१३ रोजी आपसी समझोता होवून वाद जमीन पुन्हा वादींच्या ताब्यात देण्यात आली. तेव्हापासून वाद जमीन हि वादींच्या ताबा व वहिवाटीत आहे. असे असतांना दिनांक १८/०६/२०२० रोजी प्रतिवादींनी वाद जमीनीचा ताबा बळजबरीने घेण्याकरीता वादींना जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे वादींनी प्रस्तुतच्या दावासह सदरचा अर्ज दाखल केला.

०३) प्रतीवादींनी निशाणी क्र.२३ अन्वये उत्तर दाखल करुन वादींच्या कथनाला विरोध दर्शविला. प्रतीवादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्रमांक ०१ चे वडील संपत लुटे यांची सेवा प्रतिवादी क्रमांक ०१ च्या बहिणीने केली होती व त्यामुळे प्रतिवादी क्रमांक ०१ ने वाद जमीनीचा मालकी हक्क सोडण्याचा लेख दिनांक ३०/०१/२०१४ रोजी लिहून दिला होता व वादी क्रमांक ०१ हि प्रतिवादी क्रमांक ०१ ची रखेल असल्यामुळे तिला कायदेशीर हक्क प्राप्त होत नाही. सबब, वादींचा अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादींनी केली.

०४) उभय पक्षाचे कथन व अभिलेखावर दाखल केलेल्या दस्ताऐवजांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यानुसार खालील मुद्दे माझ्या अवलोकनार्थ उपस्थीत झाले आणि त्यावर मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | वादींच्या पक्षात सकृत दर्शनी केस आहे काय? | **होकारार्थी.** |
| ०२. | वादींच्या बाजुने न्यायाचा समतोल आहे काय ? | **होकारार्थी.** |
| ०३. | वादींची तात्पुरता मनाई हुकूमाची मागणी नाकारल्यास वादींचे कधीही भरून न निघणारे नुकसान होईल काय ? | **होकारार्थी.** |
| ०४. | आदेश काय ? | **अंतीम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ साठी :—**

०५) वादींनी त्यांचे कथनाचे पृष्ठर्थ किरकोळ फौजदारी अर्ज क्रमाक २२/२०१३ व त्यामध्ये झालेल्या आपसी समझोत्याची सत्यप्रत, फौजदारी मामला

क्रमांक ३२/१९९३ मध्ये करण्यात आलेले आपसी समझोता पत्र, पोलीस ठाणे, देसाईगंज व तहसिल कार्यालय, देसाईगंज यांच्याकडे दिलेली तक्रार, उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांचे रा.मा.क्र.–आरटीएस.–६४/१०/२०१५–२०१६ मौजा नैनपुर यामधील दिनांक २७/०३/२०१७ रोजीचा आदेशाची सत्यप्रत, अदखलपात्र गुन्हयाची नोंद, सातबारा उतारा इत्यादी दस्तऐवज दाखल केले आहेत. प्रतिवादींनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठर्थ कोणतेही दस्तऐवज दाखल केले नाहीत.

०६) वादीचे विद्वान वकील श्री. वारजुकर यांनी त्यांच्या कथनाचा व दस्तऐवजांचा आधार घेवून युक्तीवाद केला की, वाद जमीन हि आपसी समझोत्याप्रमाणे वादींच्या कायदेशीर ताबा व वहिवाटीत आहे. त्यामुळे प्रतिवादींना वादींच्या वाद जमीनीवरील ताबा व वहिवाटीस अडथळा करण्याचा कोणताही अधिकार नाही.

०७) याउलट, प्रतिवादींचे विद्वान वकील श्री. पिलारे यांनी युक्तीवाद केला की, सध्या ताबा प्रतिवादी क्रमांक ०१ चा असून त्यावर प्रतिवादींनी धान पिकांची लावणी केलेली आहे. त्यामुळे वादींच्या सदरहू अर्जाला कोणताही आधार नाही.

०८) वादींनी दाखल केलेल्या दस्तऐवज क्रमांक ०१ व ०२ वरुन दिसून येते की, पहिल्यांदा फौजदारी मामला क्रमांक ३२/१९९३ मध्ये आपसी समझोता करुन वाद जमीन हि प्रतिवादी क्रमांक ०१ ने वादींच्या ताबा वहिवाटीत दिलेली दिसून येते. त्यानंतर पुन्हा किरकोळ फौजदारी मामला क्रमांक २२/२०१३ यामध्ये मध्यस्थीद्वारे आपसी समझोता होवून वाद जमीन पुन्हा वादींच्या कब्जावहिवाटीत देण्यात आल्याचे व त्यासंदर्भाने बोजा दर्ज करण्याचे कबुल केल्याचे दिसून येते. उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी शांताबाई पत्रे हिने दाखल केलेली फेरफार संबंधी अपील खारीज

केलेली आहे असे दिसून येते. वादी कमांक ०१ ने दिनांक २२/०६/२०२० रोजी पोलीस ठाणे, देसाईगंज व तहसिलदार, देसाईगंज यांच्याकडे प्रतिवादींनी वादींच्या वाद जमीनीवरील कब्जा वहिवाटीस अडथळा केल्याबाबत दस्तऐवज कमांक ०३ व ०४ अन्वये तकार दाखल केली होती. त्याचप्रमाणे सन २०१८ मध्ये प्रतिवादी कमांक ०१ ने वाद जमीनीवरील उभ्या पिकावर तणनाशक औषधी फवारुन रोपटयांची नुकसान केल्याबाबतची तकार वादी कमांक ०१ ने प्रतिवादी कमांक ०१ विरुध्द दिली असल्याचे दस्तऐवज कमांक ०६ अन्वये दिसून येते.

०९)	वरिल सर्व दस्तऐवजांवरुन वाद जमीन हि प्रतिवादी कमांक ०१ ने वादींच्या पालनपोषनाकरीता न्यायालयात आपसी समझोता करुन वादींच्या ताब्यात व वहिवाटीत दिली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सध्या वाद जमीनीवर प्रतिवादी कमांक ०१ चा ताबा व वहिवाट असून त्याचे धान पिक उभे असल्याच्या प्रतिवादींच्या विद्वान वकीलाच्या कथनाला कोणताही आधार दिसून येत नाही. सबब, सकृतदर्शनी केस वादींच्या पक्षात आहे. वाद जमीन हि वादींना पालनपोषनाकरीता दिलेली असल्याने वादींचा अर्ज नाकारल्यास प्रतिवादी त्यावर बळजबरीने कब्जा करतील व अश्या परिस्थीतीत वादींकडे पालनपोषनाचे कोणतेही साधन उरणार नाही. त्यामुळे निश्चीतपणे वादींचा अर्ज फेटाळल्यास त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान संभवते. या सर्व विवेचनांवरुन मी अश्या निष्कर्षाप्रत पोहचलो आहे की, वादी हे मागणीप्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकूमास पात्र ठरतात. परिणामी, मी मुद्दा कमांक ०१ ते ०३ करीता होकारार्थी निष्कर्ष नोंदवित असून पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१) वादीचा अर्ज (नि.०५) मंजूर करण्यात येतो.

२)   प्रतिवादी, त्यांचे नोकरचाकर अथवा त्यांच्या वतीने कुणीही वादींच्या वादजमीनीवरील कब्जा वहिवाटीस दाव्याचा अंतीम निकालपर्यंत कोणत्याही प्रकारचा अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम देण्यात येतो.

०३)   खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Anandrao Rushi Bhadke
Digitally signed by Anandrao Rushi Bhadke
Date: 2020.11.09 14:44:19 +0530

**(आ.ऋ. भडके)**
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
देसाईगंज

स्थळ :देसाईगंज
दिनांक : ०९/११/२०२०